# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अकोला    **P.S.(ठाणे):** खदान
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0701    **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ):** 02/03/2026 19:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार    **Date From (दिनाक पासून):** 02/03/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5    **Date To ( दिनाक पर्यंत):** 02/03/2026
**Time From (वेळेपासून):** 12:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनाक ):** 02/03/2026    **Time (वेळ):** 19:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 040
**Date & Time (दिनाक आणि वेळ):** 02/03/2026 19:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महात्मा फुले मागासवर्ग विकास
(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रविण जनार्दन वेरूळकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत , प्रतिबधक विभाग, अकोला,खदान,अकोला, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत , प्रतिबधक विभाग, अकोला,खदान,अकोला, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9765141925

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. छगनलाल लथ्थु सुरजे | | | 1. जुनी वस्ती कांडली, अंबाळा रोड,,रोड, परतवाडा ता अचलपूर जि अम,खदान, अकोला,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम रू. 500/ | 500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यावेळी डे ऑफिसर ASI 247जामनिक यांनी अप क्र ./2026कलम 7 भ्रष्टाचार प्रतीबंध अधीनीयम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल केला

फिर्याद लाचलुचपत प्रतिबधक विभाग,अकोला दिंनाक:- 02/03/2026

मी प्रविण जनार्दन वेरूळकर, वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबधक विभाग, अकोला शासनातर्फे फिर्याद देतो की, दिंनाक 23.02.2026 रोजी तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार, वय 55 वर्ष, षिक्षण- 12 वी, व्यवसाय-षेळी पालन, रा. अंदुरा ता. बाळापूर जि. अकोला हे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार देयाकरीता लाचलुचपत प्रतिबधक विभाग, अकोला समक्ष हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांना त्यांचे तक्रारी बाबत प्रथम सविस्तर विचारपूस केली. त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तोंडी तक्रार नोंदवुन घेण्याची विंनती केली.

सदर तक्रारीवरुन पुढिल कार्यवाहीकरीता मा. तालुका कृषी अधिकारी, कार्यालय अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 235/2026, दिंनाक 23.02.2026 अन्वये पत्र दिले. त्यावरून त्यांनी त्यांचे कार्यालयातील 1) श्री. नंदकिषोर देविदास बोळे व 2) श्री. उमेष देविदास हिवाळे यांना पंच म्हणुन लाप्रवि. अकोला कार्यालयात पाठविले. नमुद दोन्ही पंचांची सदर कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याबाबत संमती घेण्यात आली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत त्यांना तोंडी विचारपुस करण्यास सांगीतले. त्यावरून दोन्ही पंचांनी तक्रारदारास विचारणा केली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांची तोंडी तक्रार कार्यालयीन लॅपटाॅपवर टंकलिखित करण्यात आली. सदर टंकलिखित तक्रारीची प्रिंट आऊट काढून त्या तक्रारीवर श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांचेकडे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केलेला मजकुर सारखाच असल्याची आमची व दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालील प्रमाणे आहे.'' मी आज दिंनाक 23.02.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर येवुन तक्रार देतो की, मी वर नमुद पत्यावर राहत असुन ग्राम अंदुरा येथे शेळी पालनाचे कामे करतो. ''महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या.) मुंबई'' अंतर्गत शासनाकडुन शेळी पालन करण्याकरीता कर्ज मंजुर करण्यात येते. त्याअनुषंगाने मी माझी पत्नी सौ. ज्योती हिंम्मतराव शेगोकार हिचे नांवे विषेष घटक बिंजभाडवल योजने अंतर्गत शेळी पालन करण्याकरीता रू. 2,50,000 /- कर्ज मंजुर करण्याकरीता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या, जिल्हा कार्यालय अकोला येथे 8-10 दिवसापुर्वी गेलो होतो. त्यावेळी मला त्याठिकाणी श्री. सुरजे, जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या, अकोला हे भेटले व ते मला म्हणाले की, सदर प्रकरणात त्रुटी असुन त्यामधील त्रुटी पुर्तता करून घेवून या, तसेच मी तुम्हाला या योजनेअंतर्गत सदर कर्ज मंजुर होण्याकरीता षिफारस करतो, त्याकरीता मला 500/-रू. लागतील. त्यावर मी त्यांना 'साहेब ऐवढे पैसे कष्याचे लागतात' असे विचारले असता, त्यांनी मला सांगीतले की, 500/- रूपये दिल्याषिवाय तुमचे काम होणार नाही. त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव ठिक आहे त्रुटी पुर्तता करून परत येतो असे म्हणुन निघुन आलो.

गैरअर्जदार श्री. सुरजे, जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अकोला यांनी माझी पत्नी सौ. ज्योती हिंम्मतराव शेगोकार हिचे नांवे विषेष घटक बिंजभाडवल योजने अंतर्गत शेळी पालन करण्याकरीता कर्ज मंजुरीसाठी षिफारस करण्याकरीता माझेकडे मागणी लाच रक्कम रू. 500/- त्यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. माझी त्यांचेषी कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण अथवा वैमनस्य नाही.'' तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही दिंनाक 23.02.2026 चे 12.14 वा. ते 12.56 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अकोला यांची तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय अकोला येथे करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांनी तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांना ''काही सोय साय, काही आहेत का मंग, आज किती आहेत, घेवून या येतांना'' अष्या प्रकारची बोलणी केली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार यांनी तक्रारदाराकडे असलेल्या लाच रकमेची स्पष्ट मागणी न केल्याने गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांची तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांचेकडे असलेल्या लाच मागणीची पुन्हा पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही दिंनाक 23.02.2026 चे 16.46 वा. ते 17.07 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अकोला यांची तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पुन्हा पडताळणी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय अकोला येथे करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांनी तक्रारदार श्री. हिंम्मतराव शेगोकार यांना ''द्याना हजार पाचषे रूपये'' असे म्हणुन लाच रकमेची मागणी केली. त्यावर तक्रारदाराने ''बर, काही हरकत नाही, बर पाचषे देतो सर मग'' असे म्हटले असता गैरअजदार श्री. सुरजे यांनी ''हं'' म्हणुन त्यावर संमती दिली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. सुरजे यांनी तक्रारदार श्री. हिंम्मतराव शेगोकार यांचेकडे रू. 500/- लाच रकमेची स्पष्ट मागणी केल्याने गैरअर्जदार यांचेविरूध्द पुढील सापळा कार्यवाही दिंनाक 24.02.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिंनाक 23.02.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर दिंनाक 24.02.2026 चे 16.04 वा. ते 16.27 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांचेविरूध्द महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय अकोला येथे सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक हे कार्यालयात हजर मिळून आले नाही. तसेच इतर कर्मचारी हजर मिळून आले नाहीत. त्यामुळे गैरअर्जदार यांचेविरूध्दची पुढील कार्यवाही सोमवार दिंनाक 02.03.2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दिंनाक 24.02.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

त्यानंतर आज दिंनाक 02.03.2026 चे 12.40 वा. ते 13.27 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांचेविरूध्द महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय अकोला येथे सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांनी तक्रारदार श्री. हिंम्मतराव बाबुलाल शेगोकार यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 500/- त्यांच्या कार्यालयातील पहील्या मजल्यावरील स्वच्छतागृहातमध्ये स्विकारल्यानतर गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांना लाच रकमेसह रंगेहात पकडण्यात आले. त्यानंतर गैरअर्जदार श्री. सुरजे, लिपीक यांनी तक्रारदाराकडुन स्विकारलेली लाच रक्कम रू. 500/- दोन्ही पंचासमक्ष जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली. दिंनाक 02.03.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 3 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

करीता गैरअर्जदार श्री. छगनलाल लथ्थु सुरजे, वय 56 वर्ष, पद-लिपीक/कार्यालयीन सहायक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, डाॅ. बाबासाहेब आंबेडकर भवन, निमवाडी, अकोला रा. जुनी वस्ती कांडली, अंबाळा रोड, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने माझी त्यांचे विरूध्द शासनातर्फे कायदेषीर फिंयाद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

manoj tulshiram kedare(I (Inspector)) / api **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):
दि.03/03/2026 चे 11/00 वा.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

DUTY OFFICER
Police Station Khadan
Dist. Akola

**Name** (नाव): manoj tulshiram kec
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): api